| | |
|---|---|
| MHYA160004082026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३५/२०२६**<br>**श्रीमती शोभा पुंडलीक ढोकणे+ ४ वि.**<br>**कोणी नाही** |

## निशाणी क्र.१ खालील आदेश

## दिनांक ०३/०८/२०२६

अर्जदारांनी हा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ चे पती, अर्जदार क्र. २ ते ५ चे वडील नामे पुंडलीक केशव ढोकणे हे दिनांक १६/०८/२०२५ रोजी मौजा अमरावती, ता. व जि. अमरावती येथे मयत झाले आहेत. पुंडलीक केशव ढोकणे हे मौजा वाटखेड बु, ता. बाभुळगाव जि. यवतमाळ येथील रहिवासी होते व त्यांच्यावर अंत्यसंस्कार मौजा वाटखेड बु, ता. बाभुळगाव,जि. यवतमाळ येथे करण्यात आले. तसेच मयत पुंडलीक केशव ढोकणे यांची आई नामे मुक्ताबाई केशवराव ढोकणे या सुध्दा यापूर्वीच मयत झाल्या आहेत. पुंडलीक केशव ढोकणे यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. पुंडलीक केशव ढोकणे यांच्या मृत्यूनंतर अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारसा दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांतर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेत आला आहे.

०३. अर्जदारांचे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कथने विचारात घेतल्यानंतर माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत मी त्या मुद्दयांवरील निष्कर्ष कारणमिंमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. अर्जदार हे त्यांच्या मागणी प्रमाणे बॉम्बे रेग्सुलेशन अक्ट VIII १८२७ चे कलम ८ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | ... | होय. |

०२. कोणता आदेश ? ... अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ –**

०४. पुंडलीक केशव ढोकणे हे मयत झाल्याबाबत निशाणी ३/१ वर मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत दाखल करण्यात आलेली आहे. त्यावरुन हे सिध्द होते की, पुंडलीक केशव ढोकणे हे दि. १६/०८/२०२५ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या व्यतिरिक्त मयत पुंडलीक केशव ढोकणे यांना कोणीही वारस नाहीत. या संदर्भात दैनिक "मातृभुमी" या वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस काढून देखील कोणीही आक्षेप घेतलेला नाही. अर्जदारांनी निशाणी ०८ कडे अर्जदार क्र. ५ अमोल पुंडलीक ढोकणे यांचे पुराव्याचे शपथपत्र दाखल करून अर्जातील कथनांचा पुनरूच्चार केला आहे. सदर कथने विना आव्हानीत राहिली आहेत. निशाणी क्र. ३/१ कडे पुंडलीक केशव ढोकणे यांचा मयताचा दाखला, निशाणी क्र. ३/२ कडे पोलीस पाटील मुस्ताबाद यांचा वारसाचा दाखला, ३/३ ते ३/७ कडे अर्जदारांच्या आधारकार्डांची प्रमाणीत प्रती, निशाणी क्र. ३/८ वर पाणी कर वसुलीची पावतीची छायांकीत प्रत दाखल केली आहे दाखल पुराव्यावरुन हे सिध्द होते की, अर्जदार हे मयत पुंडलीक केशव ढोकणे यांचे वारस आहे.

०५. अर्जदार हे पुंडलीक केशव ढोकणे यांचे वारस असल्याने व त्याबाबत कोणाचाही आक्षेप नसल्याने अर्जदारांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब, अर्जदारांचे नावे ते मयत पुंडलीक केशव ढोकणे यांचे वारस असल्याबाबतचे वारसा प्रमाणपत्र देता येईल. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होय असे देतो.

**मुद्दा क्रमांक २ –**

०६. अर्जदार यांनी अर्ज सिध्द केलेला असल्यामुळे अर्ज मंजुर करणे योग्य आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक २ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. अर्जदार क्र. १ श्रीमती शोभा पुंडलीक ढोकणे, अर्जदार क्र. २. सौ. सुजाता संजय खडसे, अर्जदार क्र.३ सौ. सुदर्शना जयंत देवकर, अर्जदार क्र.४ सौ. प्रतिभा संदिप देवघरे व अर्जदार क्र. ५ अमोल पुंडलीक ढोकणे हे मयत पुंडलीक केशव ढोकणे यांचे कायदेशीर वारस आहेत असे घोषीत करण्यात येत आहे.

०३. अर्जदारांच्या नावे आवश्यक असणारा मुद्रांक शुल्क घेवून वारसा दाखला देण्यात यावा.

०४. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Date: 2026.08.03 17:49:45 +0530

ठिकाण :- बाभुळगांव.
दिनांक :- ०३/०८/२०२६.

(एच. एस. सातपुते)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बाभुळगांव.